भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

KG 241868

वि. क्र. ४५६० दिनांक २६/२/२०१४

घे. नाव सिद्धी विकास संस्था इंमकॉन

हस्ते ...

TREASURY OFFICE SATARA

11 FEB 2014

STAMP HEAD CLERK

श्री. सुहास मधुकर मारुलकर, मुद्रांक विक्रेता

करारनामा

१) प्राचार्य,

सातारा मराठा विद्या प्रसारक समाजाचे

कला व वाणिज्य महाविद्यालय,

५१, यादोगोपाळ पेठ, सातारा

आणि

२) कार्यकारी संचालक

एसव्हिएस - इंमकॉन सातारा

Scanned by CamScanner

वरील दोन संस्थांमध्ये नविन उद्योजकांना उद्योग सुरु करताना लागणारी सर्वतोपरी मदत, प्रशिक्षण
कार्यक्रम, मार्गदर्शन, तसेच उद्योग सुरु करेपर्यंत लागणारी मदत, सहयोजक व एकमेकांना पुरक
ठरेल अशा पद्धतीने दोन्हीही संस्थांची एकमेकांना मदत करणेसाठी सदर करार करणेत येत आहे.

हा करार आज दिनांक ०७/०२/२०१४ ते दिनांक ०७/०२/२०१७ या कालावधी करता येत असून
त्यातील मुद्दे खालील प्रमाणे राहतील.

१. एसव्हिएस - इमकॉन सातारा हि संस्था केंद्र शासनाची सहयोगी संस्था म्हणून नोंदणीकृत झालेली असून केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघु एवंम मध्यम उद्योग विकास संस्था, (एम.एस.एम.ई.) डी. आय, मुंबई, तसेच विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली, ईडीआयआय, अहमदाबाद, मिनीस्ट्री ऑफ फुड प्रोसेसिंग, नवी दिल्ली यांचे सहकार्याने औद्योगिक प्रेरणा अभियान, उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम, कौशल्यावर आधारीत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम, तसेच व्यवस्थापन कौशल्यवृध्दी प्रशिक्षण असे विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवित असते. या करीता संस्थेस केंद्र शासनाकडून वित्तीय सहाय्यता मंजूर होत असते.

२. सातारा मराठा विद्या प्रसारक समाजाचे कला व वाणिज्य महाविद्यालय सातारा हे कॉलेज कला व वाणिज्य या क्षेत्रातील विद्यार्थ्यांनकरीता उच्च माध्यमिक व पदवी अभ्यासक्रम घेत असते.

३. विद्यार्थ्यांनी उद्योगाकरीता प्रवृत्त व्हावे तसेच वेगवेगळ्या प्रकारचे स्थानिक गरजेवर आधारीत उद्योग व स्वयंरोजगार स्थानिक पातळीवर सुरु करावेत या करता दोन्हीही संस्था संयुक्तपणे प्रयत्न करतील.

४. या महाविद्यालयातील आजी व माजी विद्यार्थ्यांकरता अशा प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम घेणेकरता दोन्हीही संस्था प्रयत्नशील राहतील.

५. प्रशिक्षण कार्यक्रम पुर्ण करण्याकरता येणारा खर्च एसव्हिएस - इमकॉन सातारा हि संस्था शासकीय अथवा खाजगी स्वरुपात उभा करेल.

६. प्रशिक्षण कार्यक्रम घेणेकरता लागणारे तज्ञ व अनुभवी वक्ते व उद्योजक एसव्हिएस - इमकॉन सातारा उपलब्ध करेल. तसेच त्यांचा मेहनतानाही पुर्ण करेल याची कोणतीही जबाबदारी कॉलेजवर राहणार नाही.

७. कला व वाणिज्य महाविद्यालय सातारा हे प्रशिक्षण कार्यक्रम घेणेकरता कॉलेजचे स्वयंप्रेरणेने वेळ देऊ इच्छिणारे १ ते ३ इतके प्राध्यापक व इतर कर्मचारी उपलब्ध करून देईल.

८. कला व वाणिज्य महाविद्यालय सातारा हे प्रशिक्षण कार्यक्रम घेणेकरता लागणारी जागा, ब्लॅक बोर्ड, बेंचेस, ओव्हरहेड प्रोजेक्टर, साऊंड सिस्टीम, लाईट हे उपलब्ध करून देईल. त्या करीता सरकारी नियमाप्रमाणे मिळाणारा खर्च एसव्हिएस - इमकॉन सातारा कॉलेजकडे चेक स्वरूपात अदा करेल व त्या करता लागणारी रिसीट महाविद्यालय उपलब्ध करून देईल.

९. सदर प्रशिक्षण कार्यक्रम घेत असताना उपलब्ध इमारत व सामानाची काळजी दोन्हीही संस्थांचे प्रशिक्षण समन्वयक योग्य पद्धतीने घेतील. यात महाविद्यालयाचे काहीही नुकसान झाल्यास एसव्हिएस - इमकॉन सातारा भरून देईल.

१०. दोन्हीही संस्थांनी मिळून या महाविद्यालयाचे आजी व माजी असे करार कालावधीत सुमारे २०० उद्योजक, स्वयंरोजगार निर्माण करण्याकरता हा करार केला आहे.

११. हा करार वरील कालावधी करता दोघांवरही बंधनकारक राहील.

१२. हा करार मुदतीआधी रद्द करावयाचा झाल्यास दोन्ही संस्था एकमेकांना ३० दिवस अगोदर लेखी सुचनेद्वारे माहिती देतील व करार संपुष्टात आणतील.

प्राचार्य
कला व वाणिज्य महाविद्यालय,
सातारा.

प्राचार्य
सातारा मराठा विद्या प्रसारक समाजाचे
कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा
७१, यादोगोपाळ पेठ, सातारा

SVS's
IMCON SATARA
Executive Director

कार्यकारी संचालक
एसव्हिएस इमकॉन - सातारा

L. M. BHOI
NOTARY & ADVOCATE
SATARA DISTRICT
MAHARASHTRA
R. No. 5223
GOVT. OF INDIA

SIDDHI VIKAS SANSTHA
Reg. No. F-5118
INDUSTRIAL & MANAGEMENT CONSULTANCY ORGANISATION
SATARA

BEFORE ME
SHRI L. M. BHOI
NOTARY & ADVOCATE
S-6, Guruvihar Residency
6/1/E/A, Shukrawar Peth, Satara
Mob.9823083469

Scanned by CamScanner